फुले आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते
कालकथित श्याम बनकरी
कालकथित शशिकांत कोरे
यांच्या स्मृतीस....

आयु. राजा ढाले यांच्या कोल्हापूर येथे २५ डिसेंबर, २००९ रोजी आयोजित केलेल्या जीवन गौरव समारंभानिमित्त **'धम्मक्रांती'च्या परिप्रेक्ष्यात राजा ढाले** या प्रकाशित होत असलेल्या पुस्तिकेत आंबेडकरी 'धम्मक्रांती'चे त्यांचे आकलन आणि त्यांनी लावलेल्या अन्वयार्थाचा थोडक्यात परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे. या पुस्तिकेमुळे राजा ढाले यांचे लेखन मुळातून वाचण्याची प्रेरणा वाचकांना मिळेल अशी अपेक्षा.

या पुस्तिकेच्या निर्मिती प्रक्रियेत सहकार्य केल्याबद्दल प्रा. डॉ. भरत नाईक, प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, आयु. एम. डी. कांबळे, डॉ. शशिकांत खिलारे, प्रा. साहेबराव नितनवरे, डॉ. धम्मपाल रत्नाकर यांचे आभार.

भारती मुद्रणालयाचे निहाल आणि त्यांचे सहकारी यांचे आभार.

– गौतमीपुत्र कांबळे
२५ डिसेंबर, २००९

# ‘धम्मक्रांती’च्या परिप्रेक्ष्यात राजा ढाले

॥१॥

> ‘कीर्तीचा लोप ही क्षुल्लक गोष्ट आहे; पण प्रज्ञेचा लोप ही खरोखरीच दु:खद गोष्ट आहे.’ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आपल्या *‘बुद्ध आणि त्यांचा धम्म’* या पुस्तकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अधोरेखित केलेल्या उक्तीनुसार प्रसंगी कीर्तीचा लोप झाला तरी बेहत्तर; पण कोणत्याही परिस्थितीत आपल्या प्रज्ञेचा लोप होऊ न देता, चाळीस वर्षांहून अधिक काळ चळवळीत गतिमान राहिलेल्या दुर्मीळातल्या दुर्मीळ व्यक्तिमत्त्वाचे नाव आहे आयु. राजा ढाले.

तसे हे नाव महाराष्ट्रात, देशात आणि देशाबाहेरही पोहचले ते १९७२ च्या ‘दलित पॅन्थर’ या सामाजिक संघटनेच्या स्थापनेच्या निमित्ताने. विशेषत: तिच्या आक्रमक कृतिशीलतेमुळे. परंतु, राजा ढाले यांचे नाव तत्पुर्वीच मराठी साहित्यवर्तुळातल्या चर्चेच्या केंद्रस्थानी असायचे. त्याचे कारण लघुअनियतकालिकाच्या चळवळीतील त्यांचे प्रज्ञेशी इमान राखणारे बंडखोर विचार. या चळवळीतील अन्य काही लोक मात्र प्रस्थापित साहित्य व्यवस्थेला छेद देण्याच्या प्रयत्नात स्वत:च थोर लेखक वगैरे होऊन कधी प्रस्थापित झाले हे त्यांचे त्यांनाही कळले नाही. किंबहुना त्यासाठीच ते या चळवळीत आले असावेत. अशा लोकांना राजा ढाले यांनी त्यावेळीच बजावले होते –

> ‘.....या संधिसाधू माणसांना सांगावसं वाटतं की, अनियमितके काढण्यानं प्रतिष्ठा वाढते, या अनुरोधानं जर या चळवळीत तुम्ही अनियमितकांची भर घालत असाल तर ती मूर्खपणाची गोष्ट होय : किंबहुना प्रतिष्ठित होण्यासाठी अनियमितकांची कास धरणं मूर्खपणाचे ठरेल :’[१]

इथे आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे या चळवळीला राजा ढाले यांनी काही नव्या संज्ञा पुरविल्या. उदा. वरील परिच्छेदातील ‘अनियमितके’ ही संज्ञा होय. अशा काही सार्थ संज्ञा राजा ढाले यांनी या चळवळीला दिल्या. परंतु पुढे साहित्य क्षेत्रातील ही मंडळीच स्वार्थापोटी वा अज्ञानापोटी त्या विसरून गेली. या संदर्भातील चंद्रकांत पाटील यांनी *‘उगवाई’*च्या अंकात ‘चक्रवर्ती राजाच्या ‘सेन’ गोष्टी’ या लेखात व्यक्त केलेली खंत विचारात घेण्यासारखी आहे. ते या लेखात म्हणतात :